| Names of Title Deed Holders | Description of property/ ies | Date & Time of e-Auction: | Reserve Price and EMD Details : | Date & Time of Inspection property |
|---|---|---|---|---|
| **Yardstick Trading Pvt Ltd** | **1) Property ID: SBIN77809534987** **2)** Three land parcels (Industrial land) owned by Yardstick Trading Pvt Ltd situated at Biloshi Village, Post Khanivali, Taluk Wada, District Wada - 421312 bearing Survey Nos. Gut No. 764/1, 766 /2B and 767. The total area of above three plots is 37,800 Sq. meters. All three land parcels are sold together. **3) Brief description of three land parcels:** **a)** Gut No. 764/1 is admeasuring 1H 20R 0P (i.e 12,000 Sq. meters approx.) (This plot is covered under Sale deed dated 21.06.2011 (Registration No. WDT-1532-2011 on 22.06.2011 at Sub-registrar Wada) **b)** Gut No. 766/2B admeasuring 0H 37R 0P (i.e 3700 Sq. meters approx.) **c)** Gut No. 767 admeasuring 2H 21R 0P (i.e 22,100 Sq. meters approx.) (Both Gut No. 767& Gut No. 766/2B is covered under Sale deed dated 21.06.2011 (Registration No. WDT-1509-2011 on **21.06.2011** at Sub-registrar Wada) **Boundaries of the property (as per actual): North:** As per plan mentioned in Sale deed, **South:** As per plan mentioned in Sale deed, **East:** As per plan mentioned in Sale deed, **West:** As per plan mentioned in Sale deed . | **Date: 15.07.2026** Time of auction: 11:00 a.m. to 4:00 p.m. | The Reserve Price will be **Rs. 6,12,00,000.00** (Rupees Six Crores Twelve Lakhs only) and the Earnest Money Deposit will be **Rs. 61,20,000.00** (Rupees Sixty One Lakhs Twenty Thousand only). | Date: **01.07.2026** Time: 11.00 am to 3.00 pm. |

***CARE: It may be noted that, this e-auction is being held on "AS IS WHERE IS BASIS, AS IS WHAT IS BASIS and "WHATEVER THERE IS". For detailed terms and conditions please visit the auction site.**

Intending Bidders / purchasers has to transfer the EMD amount through registration in our service provider BAANKNET. e-auction web portal https://baanknet.com/eauction-psb/eauction/ through online mode in his Global EMD Wallet well in advance before the auction time. In case EMD amount is not available in Global EMD Wallet, system will not allow to bid. The Registration, Verification of KYC documents and transfer of EMD in Wallet must be completed well in advance, before auction. Interested bidder may deposit Pre-Bid EMD with EBKRAY before the close of e-Auction. Credit of Pre-Bid EMD shall be given to the bidder only after receipt of payment in EBKRAY's Bank account and updation of such information in the e-auction website. This may take some time as per banking process and hence bidders, in their own interest, are advised to submit the pre-bid EMD amount well in advance to avoid any last minute problem.

There is no encumbrance known to authorised officer. However, the intending bidder should make their own enquiry and due diligences regarding the encumbrance upon the property from respective offices / department. The payment of all statutory / non-statutory dues, taxes, rates, assessments, charges, fees etc., owing to any authority or to anybody shall be the sole responsibility of successful bidder only. For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in State Bank of India, the Secured Creditor's websites:

**www.sbi.co.in and https://baanknet.com/eauction-psb/eauction/**

| Bank website www.sbi.co.in | e-auction website- https://baanknet.com/eauction-psb/eauction/ |
|---|---|
| | |

| Property ID No | Lot No | Property Location: | Photos of Property |
|---|---|---|---|
| SBIN77809534987 | 1 | | |

**STATUTORY 15 DAYS SALE NOTICE UNDER SARFAESI ACT**

The Borrowers / Guarantors have been given notice as required under proviso of rule 8 (6) of Security Interest (Enforcement) Rules, 2002.

**Date: 29.05.2026**
**Place: Mumbai**

**Sd/-**
**Authorized Officer, State Bank of India**



# ‘सर्वोदय’च्या अजिंक्यची ‘अग्निवीर’पदी निवड

**कल्याण :** ‘संकल्प’ संस्थेच्या, सर्वोदय विद्यालयातील अजिंक्य पगारे याची भारतीय सैन्यदलात ‘अग्निवीर’ जनरल ड्युटी पदावर निवड झाली आहे. त्यामुळे ‘संकल्प’ संस्था, सर्वोदय विद्यालय आणि पंचक्रोशीतील नागरिकांकडून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

अजिंक्य हा नाशिकमधील सुरेगाव येथील आहे. ते डोंबिवलीनजीकच्या काटई परिसरातील रहिवासी आहेत. अजिंक्यचे वडील रखमा पगारे हे पनवेल येथे कंपनीमध्ये कार्यरत असून, आई सुरेखा पगारे या शिवणकाम करणाऱ्या गृहिणी आहेत. त्याची मोठी बहीण साक्षी पगारे ही ‘एम.कॉम.’ असून सर्वोदय विद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत होती. अजिंक्यचे दहावीपर्यंतचे शिक्षण सर्वोदय विद्यालय येथे झाले. त्यानंतर त्याने ‘शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र पनवेल’ येथे वेल्डरचे प्रशिक्षण पूर्ण केले. शालेय जीवनापासूनच त्याला भारतीय सैन्यदलाचे आकर्षण असल्यामुळे त्याने येवला–जळगाव येथील प्रशिक्षक आनंद गुंड यांच्या डिफेन्स ॲकेडमीत प्रवेश घेऊन तयारी सुरू केली. त्याच्या यशाचे श्रेय तो त्याचे आई–वडील, तसेच सर्वोदय विद्यालयाचे संचालक महेंद्र पाटील, मुख्याध्यापक वीरेंद्र पाटील व शिक्षकांना देतो.


### जाहीर सूचना

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की माझे अशिल मे.त्रिमूर्ती कन्स्ट्रक्शन (ज्यांचे कार्यालय दुकान क्र. ९२, पी,पी,चेंबर्स, दुसरा मजला, के.डी.एम.सी. कार्यालयाजवळ, डोंबिवली (पूर्व), पिन ४२१२०१ येथे आहे), यांनी त्यांचे भागीदार व अधिकृत स्वाक्षरीकर्ता श्री. निखिल संतोष पाटील यांच्यामार्फत, दिनांक ०८ ऑगस्ट २०२३ रोजी माझे अशिल आणि श्री. प्रकाश भास्कर हट्टंगडी व इतर ९ व्यक्ती यांच्यामध्ये निष्पादित झालेल्या विकासासाठीच्या नोंदणीकृत कराराद्वारे खालील मालमत्तेचे विकास हक्क (Development Rights) संपादन केले आहेत. सदर मालमत्ता ही सर्व्हे क्र. ११३/१(भाग) (सी.टी.सी. क्र. ३२२१/अ/२ (पी), एस. क्र. ६०/२६/एस) वरील भूखंड क्र. ६३ मधील भूखंड क्र. ६३-अ असून, तिचे क्षेत्रफळ २३४.११ चौरस मीटर इतके आहे. ही मालमत्ता कोपर क्रॉस रोड क्र. ३, शास्त्री नगर, डोंबिवली (पश्चिम), तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, उप-नोंदणी जिल्हा कल्याण आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये स्थित असून, तिची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे :

उत्तर दिशा : रिक्रिएशन मैदान
दक्षिण दिशेला किंवा त्याच्याकडे : भूखंड क्रमांक ६४
पूर्व दिशेला किंवा त्याच्याकडे : इमारत ‘हस्ती हाईट्स’
पश्चिम दिशेला किंवा त्याच्याकडे : रस्ता

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, सदर मालमत्तेचे पूर्वाधिकारी असलेले खालील व्यक्ती, संबंधित तारखांना निधन पावले आहेत.

नाव : मृत्यूची तारीख
१) भास्करराव नरसिंह हट्टंगडी : १७/०५/१९७५
२) मनोरमा भास्कर हट्टंगडी : २२/११/१९९३
३) ललिता आर. मुल्लरपटन: ०४/०८/२०१३
४) जयंत भास्कर हट्टंगडी : २४/०८/२०१९
५) छाया भास्कर हट्टंगडी : ०२/०७/२०२४

सदर व्यक्तींनी खालील कायदेशीर वारसांव्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत:-

१) भास्करराव नरसिंह हट्टंगडी : जयंत भास्कर हट्टंगडी, ललिता आर. मुल्लरपटन, चित्रा ए. देशपांडे
२) मनोरमा भास्कर हट्टंगडी : छाया भास्कर हट्टंगडी, प्रकाश भास्कर हट्टंगडी
३) ललिता आर. मुल्लरपटन: रवींद्र आर. मुल्लरपटन, वृंदा वाय. मस्केरी, श्याम आर. मुल्लरपटन
४) जयंत भास्कर हट्टंगडी : जया जयंत हट्टंगडी, मनीषा सी. बुर्डे, तृप्ती बी. नथवानी
५) छाया भास्कर हट्टंगडी : कोणतेही कायदेशीर वारस नाहीत

ही सूचना सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळवण्यासाठी प्रकाशित करण्यात येत आहे की, जर कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा, खालील व्यक्तींच्या मालमतेवर कायदेशीर वारस म्हणून कोणताही दावा किंवा हक्क असेल १) भास्करराव नरसिंह हट्टंगडी २) मनोरमा भास्कर हट्टंगडी ३) ललिता आर. मुल्लरपटन ४) जयंत भास्कर हट्टंगडी ५) छाया भास्कर हट्टंगडी (सर्व दिवंगत), जे ‘मनुव्हिला’, कोपर क्रॉस रोड क्र. ३, जैन मंदिराशेजारी, शास्त्री नगर, डोंबिवली (पश्चिम), ता. कल्याण, जि. ठाणे येथे वास्तव्यास होते तर त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, आवश्यक कागदपत्रे आणि पुराव्यांसह आपला दावा अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडे सादर करावा. जर सदर कालावधीत कोणताही दावा प्राप्त झाला नाही, तर माझे अशिल (Client) दिनांक ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या विकास करारा’नुसार (Agreement for Development) सदर मालमतेचे विकासकाम पुढे सुरु करतील, आणि त्यानंतर सदर मालमत्तेबाबत उपस्थित केल्या जाणाऱ्या कोणत्याही दाव्यांना किंवा हक्कांना ते बांधील राहणार नाहीत.

पत्रव्यवहाराचा पत्ता
समीर एन. पाटील (अधिवक्ता)
नकुल पाटील बंगला, देवी चौक, शास्त्री नगर, डोंबिवली (पश्चिम), जि. ठाणे.
दूरध्वनी: ९८१९४०७८१०
ई-मेल: snpatil.130469@rediffmail.com
समीर एन. पाटील (अधिवक्ता)

डोंबिवली.
दिनांक : ०३/०६/२०२६



## AVISHKAR INFRA REALTY LIMITED

(FORMERLY KNOWN AS JOY REALTY LIMITED)
CIN: L65910MH1983PLC031230
**REDG.OFF:** Unit No. 301 Nestor Court ADJ to Vinayak Chs Baji, Prabhu Deshpande Marg PondGavthan, Vile Parle (W), Vileparle(West), Mumbai, Mumbai, Maharashtra, India - 400056
**CORP. OFF :** Block 1 Aashiana Plot No 24, Azadnagar CHS Ltd, N.S.Road No.1, JVPD Scheme, Vile Parle - West, Mumbai Maharastra 400056
Tel.:919558780710 ● E-mail: compliance.joyrealty@gmail.com ● Website: www.joyreality.in

**EXTRACT OF STATEMENTS OF AUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YAER ENDED MARCH 31, 2026**

(Rs. In Lakhs, except per share data)

| Sr. No. | Particulars | QUARTER ENDED | | | YEAR ENDED | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-03-2026 Audited | 31-12-2025 Unaudited | 31-03-2025 Audited | 31-03-2026 Audited | 31-03-2025 Audited |
| 1. | Total income from operations | 44.17 | 50.19 | 239.62 | 188.75 | 362.07 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items#) | 27.56 | 27.87 | 212.97 | 111.79 | 266.3 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax after Exceptional and/or Extraordinary items#) | 15.99 | 27.87 | 310.52 | 100.21 | 363.85 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 13.47 | 19.87 | 382.44 | 75.52 | 435.77 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 13.47 | 19.87 | 382.44 | 75.52 | 435.77 |
| 6. | Equity Share Capital | 2240.33 | 2240.33 | 2240.33 | 2240.33 | 2240.33 |
| 7. | Other equity capital | - | - | - | -721.75 | -797.26 |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic: | 0.06 | 0.09 | 1.71 | 0.34 | 1.95 |
| | 2. Diluted: | 0.06 | 0.09 | 1.71 | 0.34 | 1.95 |

**EXTRACTS OF STATEMENT OF AUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2026**

(Rs. In Lakhs, except per share data)

| Sr. No. | Particulars | QUARTER ENDED | | | YEAR ENDED | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-03-2026 Audited | 31-12-2025 Unaudited | 31-03-2025 Audited | 31-03-2026 Audited | 31-03-2025 Audited |
| 1. | Total income from operations | 44.86 | 50.31 | 239.72 | 189.57 | 362.17 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items#) | 27.56 | 27.87 | 212.97 | 111.79 | 266.3 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax after Exceptional and/or Extraordinary items#) | -103.68 | 11.24 | 293.73 | -210.64 | 346.06 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | -106.20 | 3.25 | 364.64 | -235.34 | 417.97 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -106.20 | 3.25 | 364.64 | -235.34 | 417.97 |
| 6. | Equity Share Capital | 2240.33 | 2240.33 | 2240.33 | 2240.33 | 2240.33 |
| 7. | Other equity capital | - | - | - | -1002.5 | -813.87 |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic: | (0.47) | 0.01 | 1.63 | (1.05) | 1.87 |
| | 2. Diluted: | (0.47) | 0.01 | 1.63 | (1.05) | 1.87 |

**Note: (A)** The above is an extract of the detailed format of Audited Standalone and Consolidated Financial Results for Quarter and year ended 31.03.2026 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. hhttps://www.avishkardevelopers.com/ **(B)** The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote. **(C)** Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

Date : 30th May 2026
Place : MUMBAI

For **AVISHKAR INFRA REALTY LIMITED**
Sd/-
**POOJAN KEYURBHAI MEHTA**
**Director & CFO**
DIN: 07800003


# जिल्हा अतिरेक्यांच्या रडारवर?

## भिवंडीतील नरपोली पोलीस ठाण्याची दहशतवाद्यांकडून रेकी

**भिवंडी, दि. २ : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील नरपोली पोलीस ठाण्याची रेकी करण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाच्या (एटीएस) तपासातून समोर आला आहे. पाकिस्तानस्थित हॅण्डलर्सच्या संपर्कात असलेल्या दोन तरुणांनी पोलीस ठाण्याचे फोटो आणि व्हिडिओ परदेशात पाठवल्याचे उघड झाल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या प्रकरणात अटक करण्यात आलेले दानियाल अशरफ (२३) आणि कृष्णा मिश्रा (२०) यांच्यावर पोलिसांवर हल्ला करण्याचा कट रचल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. भिवंडीतील या धक्कादायक ‘रेकी’च्या खुलाशानंतर आता ठाणे जिल्हा अतिरेक्यांच्या रडारवर असल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. संभाव्य धोका ओळखून प्रशासनाने तातडीने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना ‘हाय अलर्ट’ जारी केला आहे.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, दानियाल अशरफ काही काळ भिवंडी परिसरात वास्तव्यास होता. त्याने नरपोली पोलीस ठाणे, परिसरातील महत्त्वाचे पूल आणि इतर संवेदनशील ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ तयार करून पाकिस्तानस्थित हॅण्डलर्सना पाठवले होते. विशेष म्हणजे, नरपोली पोलीस ठाण्याचा १८ सेकंदांचा व्हिडिओ आणि पुलांची दृश्ये जप्त करण्यात आली असून ती शहजाद भट्टी या पाकिस्तानस्थित गँगस्टरपर्यंत पोहोचल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, आरोपींकडून मिळालेल्या डिजिटल पुराव्यांची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे. त्यांनी आणखी कोणकोणत्या महत्त्वाच्या ठिकाणांची रेकी केली, त्यामागील उद्देश काय होता आणि या आंतरराष्ट्रीय नेटवर्कमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सुरू असल्याचे ‘एटीएस’च्या एका वरिष्ठ तपास अधिकाऱ्याने सांगितले.




### मशीद पाडल्याचा बदला म्हणून पोलिसांवर हल्ल्याचा कट?

तपास यंत्रणांच्या प्राथमिक निष्कर्षानुसार, वांद्रे येथील गरीब नगर परिसरात रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान अनधिकृत मशिदीचे पाडकाम करण्यात आले होते. या कारवाईचा बदला घेण्यासाठी पोलिसांना लक्ष्य करण्याचा कट आखला गेला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नरपोली पोलीस ठाण्याची रेकी करण्यात आल्याचे समोर आले आहे.

### ‘तहरीक–ए–तालिबान’ आणि ‘आयएसआय’शी संबंध

या प्रकरणातील सर्वांत गंभीर बाब म्हणजे, आरोपींचे कथित संबंध पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी आणि ‘तहरीक–ए–तालिबान हिंदुस्तान’ या संघटनेशी जोडले जात असल्याचा तपासयंत्रणांचा संशय आहे. तसेच पाकिस्तानची गुप्तचर संस्था ‘आयएसआय’शी संबंधित काही घटकांचाही तपास केला जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय तरुणांना पैशांचे आमिष दाखवून संवेदनशील ठिकाणांची माहिती गोळा करण्यासाठी वापरले जात असल्याचेही चौकशीत समोर आले आहे.

### मोबाईलमधून भक्कम पुरावे ‘एटीएस’च्या हाती

मे महिन्यात उत्तर प्रदेश ‘एटीएस’ने दानियाल अशरफ आणि कृष्णा मिश्रा यांना अटक केली होती. त्यांच्या मोबाईल फोनमधून व्हॉट्सॲप चॅट, व्हॉईस नोट्स, ग्रुप कॉल्स, संवेदनशील ठिकाणांची छायाचित्रे आणि पाकिस्तानमधील संशयित क्रमांकांशी संपर्काचे पुरावे मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या सुरक्षेत वाढ

या खळबळजनक खुलाशानंतर भिवंडीसह ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांभोवती सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली असून केंद्रीय आणि राज्य यंत्रणा या प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. या तपासातून आणखी मोठे दुवे समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

# पोलीस मोहिमेनंतरही अंबरनाथमध्ये गोहत्या?

## कचऱ्यात गोवंशाचे अवशेष; हिंदू संघटना आक्रमक; गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अंबरनाथ, दि. २ : प्रतिनिधी**

अंबरनाथ शहरात पुन्हा एकदा गोवंश हत्येचा अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आल्याने खळबळ माजली आहे. चिंचपाडा भागातील नालंबी खदानीसमोरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात गोवंशाचे अवशेष आढळून आले आहेत. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, धार्मिक भावना दुखावून शहरात असंतोष पासरवणाऱ्या अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, बीट मार्शल कर्तव्यावर असताना पोलिसांना या प्रकाराची माहिती मिळाली. त्यानंतर घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, खुरासह असलेला जनावराच्या पायाचा तुकडा आढळून आला. तपासात हा अवशेष गाय, बैल किंवा म्हशीचा असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अज्ञात इसमांनी गोवंशाची क्रूरपणे हत्या करून, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने हे अवशेष या निर्जन ठिकाणी आणून टाकल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच परिसरातील नागरिकांनी आणि विविध हिंदू संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

यापूर्वी बदलापूरमधील अनधिकृत कत्तलखान्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली होती. त्याचवेळी अंबरनाथ शहराच्या पश्चिम भागात विविध ठिकाणी सुरू असलेल्या गोवंश मांसविक्रीच्या दुकानांवर छापे टाकून गुन्हे दाखल करण्यात आले होते. बदलापुरातून नजीकच्या शहरांमध्ये गोमांस विक्रीसाठी पुरवले जात असल्याचा प्रकारही काही दिवसांपूर्वी उघडकीस आला होता. त्यामुळे या दोन्ही शहरांमधील अवैध जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांनी गांभीर्याने पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

### ‘त्या’ धडक कारवाईनंतरही कृत्य सुरूच?

काही महिन्यांपूर्वी अंबरनाथमध्ये पोलिसांनी गोमांसविक्री आणि गोहत्येविरुद्ध मोठी मोहीम राबवली होती. पोलिसांच्या या धाडसी सत्रामुळे शहरातील अवैध गोमांस विक्रीची दुकाने आणि कत्तलखाने बंद झाले होते. मात्र, आजच्या घटनेने पोलिसांच्या कारवाईला गुन्हेगारांनी हरताळ फासल्याचे चित्र दिसत आहे. हे अवशेष नेमके कुठून आणून टाकण्यात आले आणि यामागे कोणती टोळी सक्रिय आहे, याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान आता अंबरनाथ पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

# डोंबिवलीत उजळली सावरकरांची जीवनगाथा



**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

‘महाराष्ट्र साहित्य परिषद’, पुणे–डोंबिवली शाखा आणि ‘वेध’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त योगश सोमण लिखित ‘सावरकर आणि मृत्यू’ हा अभिवाचनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. संकेत ओक आणि सौरभ सोहनी यांनी केलेल्या अभिवाचनाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. सुखदा भावे–दाबके यांचे संगीत या कार्यक्रमास लाभले. सदर कार्यक्रमाला डोंबिवलीकरांचा चांगला प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास नगरसेविका मृदुला नाख्ये उपस्थित होत्या. त्याचबरोबर, ‘मसाप डोंबिवली’च्या अध्यक्ष डॉ. धनश्री साने, उपाध्यक्ष जयंत कुलकर्णी, कार्यवाह रवींद्र फडणीस, कोषाध्यक्ष सुनील जोशी, कार्यकारिणी सदस्य मेघना कुलकर्णी, डॉ. उज्ज्वला करंडे, सचिन चोगले, अश्विनी मयेकर, धनंजय साने, मणेरीकर विनय, या व्यतिरिक्त डॉ. वृंदा कौजलगीकर आदी मान्यवर उपस्थित होते. आरती मुनीश्वर आणि प्रदीप गोसावी काही कारणास्तव उपस्थित राहू शकले नाही. तसेच ‘पै फ्रेंड्स लायब्ररी’चे सर्वेसर्वा पै, माधव जोशी, प्रज्ञेश प्रभूघाटे, सौरभ ताम्हनकर, संदीप पुराणिक व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# संघशताब्दीनिमित्त काव्यसंध्या संपन्न




**कल्याण, दि. २ : प्रतिनिधी**

‘अखिल भारतीय साहित्य परिषद’ पुरस्कृत ‘साहित्य भारती कोकण प्रांत’ व ‘सकल हिंदू समाज टिळक चौक वस्ती’ यांच्यावतीने संघशताब्दी व कै. क. ह. देशपांडे जन्मशताब्दीनिमित्त संघावर आधारित राष्ट्रप्रेमविषयक कवितांचा कार्यक्रम ‘नमस्कार मंडळ’ कल्याण येथे नुकताच पार पडला.

कार्यक्रमाचे सुरुवातीला पल्लवी रानी यांनी सरस्वती वंदना, तर सुमिता भोसले यांनी परिषद गीत सादर केले. ‘अखिल भारतीय साहित्य परिषदे’चे पदाधिकारी व ज्येष्ठ कवी प्रवीण देशमुख यांनी आपला प्रास्ताविकातून कार्यक्रमाची व उपक्रमाची भूमिका विशद केली. या काव्यसंध्येमध्ये प्रा. दुर्गेशकुमार दुबे (मम भारतमाता), पल्लवी रानी (गाथा संघ की), सतीश केतकर (संघ शाखा), सुमित्रा गुप्ता ‘सखी’ (पंचपरिवर्तन), सुशीलकुमार पांडे (प्रताप का भाला), अरुण गर्गे (असे घडवा स्वतःला), स्मिता शिंदे (धारातीर्थी), सुमिता भोसले (देशसेवेची आस) या निमंत्रित कवींनी आपल्या रचना सादर करून कार्यक्रमात रंग भरला.

याप्रसंगी क. ह. देशपांडे यांच्याविषयी माहिती सांगून त्यांच्या रचना अरुण देशपांडे यांनी सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ लेखक व सार्वजनिक वाचनालय कल्याणचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी ‘काव्यसंध्या’ उपक्रमाचे कौतुक करून राष्ट्रसाधनेबाबत संघाच्या कार्याबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच कल्याणराव देशपांडे यांच्या आठवणी जागवल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ‘साहित्यभारती’ ठाणे जिल्हा अध्यक्ष डॉ. योगेश जोशी यांनी केले, तर टिळक चौक वस्ती प्रमुख सतीश मुळावेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

# ‘डीएनएसबी’च्या गणेश धारगळकरांची ‘मॉडेल बाय लॉ’ समितीत निवड



**डोंबिवली :** ‘डोंबिवली नागरी सहकारी बँके’चे अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर यांची भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) नागरी सहकारी बँक क्षेत्रासाठी ‘मॉडेल बाय लॉ’ तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. ही मानाची नियुक्ती म्हणजे ॲड. धारगळकर यांच्या समृद्ध अनुभवाची, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची आणि सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाची पावती आहे. तसेच ‘डीएनएसबी’साठीही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट असून राष्ट्रीय स्तरावर बँकेची वाढती प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता अधोरेखित करणारी आहे. या समितीवर नागरी सहकारी बँकांसाठी अद्ययावत नमुना उपविधी तयार करण्याची जबाबदारी सोपविली असून, यामुळे बँकांचे कामकाज पारदर्शक व प्रभावी होण्यास मदत होईल. बँकेचे संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ, अधिकारी, कर्मचारी व संपूर्ण ‘डीएनएस’ बँक परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# युद्धजन्य परिस्थितीतही ‘डीएनस’ बँकेची गरुडझेप

## ७३६ कोटींच्या वाढीसह एकूण व्यवसाय ७,१०० कोटींच्या पार; बँकेकडून ग्राहकांसाठी ‘इंटरनेट बँकिंग’ सुरू

**डोंबिवली, दि. २ : प्रतिनिधी**

डोंबिवली नागरी सहकारी बँकेची ५६वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ३१ मे रोजी कल्याण–शीळ रोडवरील ‘पाटीदार भवन’ येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे बँकेने आपल्या ग्राहकांसाठी बहुप्रतीक्षित ‘इंटरनेट बँकिंग’ सेवेचा शानदार शुभारंभ केला. बँकेचे अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. या सभेला सर्व संचालक, माजी संचालक, वरिष्ठ अधिकारी, शाखा व्यवस्थापक आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष ॲड. धारगळकर यांनी आर्थिक वर्ष २०२५–२६ मधील बँकेच्या नेत्रदीपक प्रगतीचा आलेख सभेपुढे मांडला. जागतिक पातळीवर युद्धजन्य परिस्थिती असतानाही बँकेने सर्वच आघाड्यांवर घोडदौड कायम ठेवली असून, एकूण व्यवसायात गेल्या वर्षाच्या तुलनेत तब्बल ७३६ कोटींची भरीव वाढ नोंदवत एकूण व्यवसाय ७ हजार, १०१ कोटींवर पोहोचल्याने बँकिंग क्षेत्रात यशाचा झेंडा रोवला आहे.

बँकेच्या अध्यक्षांनी सभेत इंटरनेट बँकिंग सुविधेचा शुभारंभ करून ही सुविधा सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध झाल्याचे जाहीर केले. या उपलब्धीचे उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. त्याचबरोबर आगामी काळात बँक ‘फॉरेक्स सुविधा’देखील ग्राहकांना देणार असल्याचे सूतोवाच केले. बँकेतर्फे सक्षम ग्राहकसेवेसाठी ‘ग्राहक सेवा कक्ष’ही सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

बँकेच्या सभासदांसाठी १०.७५ टक्के आणि प्राधान्यक्रमाच्या भांडवलधारकांना ११ टक्के लाभांश प्रस्तावित करण्यात आला आणि सभेच्या मान्यतेनंतर त्याचे लगेच वितरण करण्यात आले. बँकेचे यश पाहून माजी अध्यक्ष उदय कर्वे यांनी शेवटी बँकेच्या संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. सभेने एकमताने तो मंजूर केला. बँकेच्या अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीमध्ये बहुमूल्य योगदान देणाऱ्या सर्व सभासद, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले. तसेच रिझर्व्ह बँक, नॅफकब, सहकारी बँकेचे विविध फेडरेशन्स, तसेच ‘सहकार भारती’, बँकचे सर्व ऑडिटर यांच्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त केली. या वार्षिक सर्वसाधारण सभेची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने झाली.




### गतवर्षीच्या तुलनेत नफ्यात अधिक चांगली वाढ

२०२५–२६ या आर्थिक वर्षात, बँकेचा निव्वळ नफा ४२.९५ कोटी एवढा झाला असून, ठेवी व कर्जवाटपात गतवर्षीच्या तुलनेत अधिक चांगली वाढ झालेली आहे. आर्थिक वर्षात बँकेकडील ठेवी ४ हजार, ४२६ कोटींवर पोहोचल्या असून, कर्ज व्यवहार २ हजार, ६७५ कोटींपर्यंत पोहोचला आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात मागील वर्षापेक्षा तब्बल ७३६ कोटींची भरीव वाढ झाली असून, आर्थिक वर्षाअखेरीस ७ हजार, १०१ कोटी एवढा मिश्र व्यवसाय झाला. आर्थिक वर्षात बँकेने राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांद्वारे ग्राहकांशी चांगला संपर्क झाला, तसेच अनेक नवीन ग्राहकांना बँकेशी जोडता आले.

### ‘नेट एनपीए’ थेट शून्य टक्के

बँकेला आर्थिक वर्ष २०२६ अखेरीस ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (ग्रॉस एनपीए) प्रमाण केवळ १.०९ टक्के व नक्त अनुत्पादित कर्ज (नेट एनपीए) ०.०० टक्के राखण्यात यश आल्याने एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

### पुरस्काराची हॅट्‌ट्रिक आणि राष्ट्रीय विस्तार

आर्थिक वर्षात बँकेला ‘महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन’चा आर्थिक वर्ष २०२४–२५चा २,५०० ते ५,००० कोटी ठेवींच्या गटातून ‘सर्वोत्कृष्ट बँक’ पुरस्कार सलग तिसऱ्या वर्षी मिळाला. त्याव्यतिरिक्त इतर आणखीन दोन पुरस्कार बँकेला मिळाले. तसेच या वर्षाच्या सुरुवातीलाच बँकेला ‘उत्कृष्ट बहुराज्यीय सहकारी बँक’, ‘बेस्ट एनपीए मॅनेजमेंट’, ‘बेस्ट डिजिटल बँकिंग’ असे प्रतिष्ठेचे पुरस्कार देऊन गौरवान्वित करण्यात आले. चालू आर्थिक वर्षात बँकेने मध्य प्रदेशमधील उज्जैन आणि इंदोर, तसेच महाराष्ट्रातील सोलापूर या ठिकाणी बँकेच्या शाखा उघडल्या. बँकेची ७०वी ‘रुणवाल गार्डन्स, डोंबिवली’ ही शाखाही नुकतीच कार्यान्वित झाली आहे.


**निवेदन**

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबावदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.